## ''भाग अ''

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)<br>(निकाल घोषित दिनांक १८/०७/२०२६)<br>**नि.फौ.ख.क्र. ८४२/२०२२** |
| MHWR030059732022 | पोलीस स्टेशन सेवाग्राम, पहिली खबर क्र. ५१३/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी<br>सेवाग्राम पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| सरकार तर्फे विधीज्ञ | | श्री. ए. एस. पठाण. |
| आरोपी | | वामन बालाजी जगताप,<br>वय : ७० वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. येसंबा, ता. जि. वर्धा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एन. डी. ढोले. |

## ''भाग ब''

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दिनांक २७/०८/२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल नोंदविल्याची तारीख | दिनांक २७/०८/२०२२ |
| दोषारोप/अर्ज/तक्रार दाखल तारीख | दिनांक २६/०९/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | दिनांक १८/१०/२०२३ |
| पुरावा प्रारंभ होण्याची तारीख | दिनांक २४/११/२०२३ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवण्याची तारीख | दिनांक १८/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल | निरंक |

### आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमिनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | दोषी किंवा निर्दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वामन बालाजी जगताप | ०८/०९/२०२२ | ०८/०९/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ३२४ व ५०४ | निर्दोष मुक्त | नाही. | ०० |

## ''भाग क''

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | विजय कुशाब वगरहांडे | १७ | घटनास्थळ पंच |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | सुनिल महादेवराव पाउलझाडे | १९ | तपासी अधिकारी |
| ०३ | सुषमा नवीन जगताप | २४ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व जखमी |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे निशानी ची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | १८ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहया |
| ०२ | २० | सुचनापत्र |
| ०३ | २१ | घटनास्थळ जप्ती पंचनामा |
| ०४ | २२ | जखमींचे सीटी स्कॅन व एक्स रे रिपोर्ट मिळणेकरीता दिलेले पत्र |
| ०५ | २३ | वैद्यकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |
| ०६ | २५ | रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

ड) मुददेमालाचे वर्णन

| क्रमांक | मुददेमाल / अर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक १८/०७/२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी भारतीय दंड विधाना (थोडक्यात भा.दं.वि.) चे कलम ३२४ व ५०४ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात येणे प्रमाणे</u> :

२. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा फिर्यादीचे वडील आहे. दि. २७/०८/२०२२ रोजी सकाळी ८ वाजताचे सुमारास मौजा येसंबा येथे फिर्यादीने त्याचे वडील आरोपीचे घरी जावून त्याला *'तुम्ही मला घराची वाटणी करून द्या'* असे म्हटले. त्यावर आरोपीने फिर्यादीस *'तुझे वेगळे घर आहे, तुला वाटणी देत नाही'* असे म्हणून लाकडी काठीने त्याचे डोक्यावर मारून जखमी केले. त्यावेळी फिर्यादीची पत्नी सुषमा तेथे आली असता आरोपीने तिला सुध्दा शिवीगाळ करून तिचे डाव्या हाताचे अंगठयाजवळ दाताने चावून तिला जखमी केले. तसेच तिला काठीने दोन्ही पायावर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने सेवाग्राम पोलिस स्टेशन येथे आरोपीविरूध्द तक्रार दिली.

३. सदर तक्रारीनुसार आरोपीविरूध्द सेवाग्राम पोलीस स्टेशन, जि. वर्धा येथे भा.दं.वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये गुन्हा क्र. ५१३/२०२२ नोंदविण्यात आला. तपासाअंती पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, सेवाग्राम यांनी आरोपीविरूध्द सदर गुन्हयांकरिता न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. न्यायालयात दोषारोपपत्र सादर झाल्यानंतर दि. १८/१०/२०२३ रोजी आरोपीविरूध्द नि. क्र. १४ वर भा. दं. वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. आरोपीचे प्रतिकथन नि.क्र. १५ वर स्वतंत्र नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्याने त्याला सदर गुन्हे कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षेची तयारी दर्शविली.

<u>अभिलेखावर सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा गोषवारा</u> :

५. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरूध्दचे दोष सिध्द करण्याकरीता एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अभिलेखावर *घटनास्थळ व जप्ती पंच* – सा. क्र. १ विजय कुशाब वगरहांडे याची साक्ष नि.क्र. १७ वर, *तपासी अधिकारी* – सा. क्र. २ सुनिल महादेवराव पाउलझाडे यांची साक्ष नि.क्र. १९ आणि *प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तथा जखमी* – सा.क्र. ३ सुषमा नवीन जगताप हिची साक्ष नि.क्र. २४ वर नोंदविण्यात आली. प्रकरणातील मुळ फिर्यादी व जखमी मयत असल्याने अभियोगपक्षाने इतर साक्षीदार न तपासता आपला पुरावा बंद केला.

६. अभिलेखावर आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे बयाण नि. क्र. २९ वर नोंदविण्यात आले. सदर जबाबाचे आणि आरोपीमार्फत घेण्यात आलेल्या उलट तपासाचे

अवलोकन केले असता आरोपीने त्याचेविरूध्दचा संपुर्ण पुरावा खोटा असल्याचे सांगून बचावाचा पावित्रा घेतल्याचे दिसून येते. आरोपीने त्याचे बचावामध्ये कोणताही साक्षीदार तपासला नाही अथवा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

७. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहायक सरकारी वकिल व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तिवाद ऐकला. त्या अनुषंगाने माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत. त्या मुद्यांवरील कारणमिमांसा व निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि. २७/०८/२०२२ रोजी सकाळी ८ वाजताचे सुमारास मौजा येसंबा, ता. जि. वर्धा येथे आरोपीने फिर्यादीला डोक्यावर काठी या शस्त्राने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली ? | ... नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी आरोपीने फिर्यादीची पत्नी सुषमा हिला काठी या शस्त्राने मारहाण करुन आणि तिचे डावे हाताचे अंगठयाला दाताने चावा घेवून इच्छापुर्वक दुखापत पोहचविली ? | ... नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी आरोपीने सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्‌देशाने प्रवृत्त करून फिर्यादीला शिवीगाळ केली ? | ... नाही. |
| ४. | अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द कोणता गुन्हा सिध्द केला काय ? | ... नाही. |
| ५. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## कारणमीमांसा व निष्कर्ष

### मुद्दे क्र. १ ते ४ च्या संदर्भात :

८. मुद्दे क्र. १ ते ४ हे आपसात निगडीत असल्याने घटनेची व पुराव्याची पुनर्रावृत्ती टाळण्याकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रित देण्यात येत आहे.

९. भा. दं. वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये अभियोगपक्षाला हे सिध्द करावे लागेल की, आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला शस्त्राने मारहाण करुन

इच्छापुर्वक दुखापत पोहचविली आणि सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उददेशाने प्रवृत्त करुन शिवीगाळ करून तिचा अपमान केला. अभियोगपक्षातर्फे सदर दोष सिध्द करण्याकरीता केवळ तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

१०. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तिवाद ऐकला.

११. वर नमुद केल्याप्रमाणे प्रकरणातील मुळ फिर्यादी व जखमी हा मरण पावल्याने अभियोगपक्षातर्फे त्याची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे उपलब्ध पुराव्याची छाननी करणे क्रमप्राप्त ठरते.

१२. अभियोगपक्षाची सा.क्र. ३ सुषमा ही प्रकरणातील जखमी व प्रत्य क्षदर्शी साक्षीदार असून तिने तिचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि. २७/१०/२०२२ रोजी सकाळी ८ वाजताचे सुमारास तिचे पतीने तिला *'तु बाबांचे ६ घरी हिस्सा मागण्यास जाते'* असे म्हटले होते. तिचे पती तिचे आधीच आरोपीचे घरी गेले होते. त्यामुळे तेथे तिने जावून बघितले असता आरोपी वामन व प्रविण जगताप हे तिचे पतीला काडीने मारहाण करीत होते. त्यामुळे तिचे पतीचे डोके फुटले आणि ते खाली पडले होते. तिने त्यांना पाणी पाजले तेव्हा आरोपी तिला *'तु येथे कश्याला आली'* असे म्हणून शिवीगाळ करत होते. तसेच प्रविण जगताप याने तिचे उजव्या हाताचे अंगठयाला चावा घेतल्याने तिला १ ते ९ टाके पडले होते.

१३. तिने पुढे कथन केले की, आरोपी वामन याने तिला काडीने पायाला, खांद्याला, पाठीला आणि हाताला मारहाण केली होती. त्यामुळे तिचे पतीने आरोपीविरूध्द सेवाग्राम पोलिस स्टेशनला जावून नि.क्र. २५ व नि.क्र. २६ वरील रिपोर्ट दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी त्यांना सरकारी दवाखाना, वर्धा येथे उपचाराकरीता पाठविले होते. उलटतपासादरम्यान तिने कबुल केले की, *'घटना आरोपीचे घरासमोर घडली, त्यावेळी आरोपी वामन व प्रविण जगताप हे दोघे तिचे पतीला मारहाण करीत होते, त्या मारहाणीत तिचे पतीचे डोके फुटले व ते खाली पडले, त्यावेळी तिने तिचे पतीला पाणी पाजले, त्यावेळी प्रविणने तिचे उजवे हाताचे अंगठयाला चावा घेतला, त्यामुळे तिला १ ते ९ टाके लागले आणि खाली पडल्यानंतर आरोपींनी तिला पुन्हा खांद्याला, पाठीला व हाताला मारहाण केली'* या सर्व बाबी तिचे पोलिस बयाणामध्ये नमुद नाहीत. तिने पुढे कबुल केले की, तिचे पतीला दारूचे व्यसन होते आणि ते व्यसनामध्ये नेहमी मारहाण करीत होते.

१४. अभियोगपक्षाचा सा.क्र. १ विजय हा प्रकरणातील घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, पोलिसांनी त्याला पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते आणि त्याचे समक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता. त्याने अभिलेखावरील नि.क्र. २१ वरील पंचनाम्यावरील केवळ त्याची सही ओळखुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाच्या विसंगत साक्ष देत असल्याने विद्वान सहाय्यक सरकारी वकिलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्ने विचारली असता त्याने अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिले नाही. तसेच त्याने पोलिसांनी त्याचेसमक्ष घटनास्थळाची पाहणी करून त्याबाबत पंचनामा केल्याचे नाकारले.

१५. अभियोगपक्षाचे सा.क्र. २ श्री. पाउलझाडे हे प्रकरणातील तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, त्यांनी तपासादरम्यान पंचांना नि.क्र. २० वरील सुचनापत्र दिले आणि त्यानंतर घटनास्थळावर जावुन त्याचा पंचासमक्ष नि.क्र. २१ वरील पंचनामा केला होता. तसेच घटनास्थळावरून गुन्हयात वापरलेली एक लाकडी वेळवाची काडी जप्त करून त्याबाबत नि.क्र. २१ वरील पंचनामा केला होता. तसेच नि.क्र. २२ वरील पत्र देवून जखमींचे सीटी स्कॅन आणि एक्स रे रिपोर्ट ही वैद्यकीय कागदपत्रे प्राप्त केली होती. त्यानंतर नि.क्र. २३ वरील पत्राव्दारे जप्त मुद्देमालाची वैद्यकीय अधिका—यांकडून क्युरी केली होती.

१६. त्यांनी पुढे कथन केले की, त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. उलटतपासादरम्यान त्यांनी कबुल केले की, घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीविरूध्द पोलिस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला होता. त्यांनी खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र सादर केल्याचे नाकारले.

१७. विद्वान सहायक सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रकरणातील मुळ फिर्यादी मरण पावला असला तरी त्याची पत्नी ही घटनेतील जखमी व प्रत्य क्षदर्शी साक्षीदार असल्याने तिची साक्ष महत्वाची ठरते. तिने तिच्या साक्षीमध्ये आरोपीने तिला व तिचे पतीला शस्त्राने मारहाण केल्याचे व शिवीगाळ करून दमदाटी केल्याचे कथन केलेले आहे. तसेच सदर मारहाण ही मिळकतीच्या वादातून झाल्याचे सुध्दा कथन केलेले आहे. यावरून आरोपीचा सदर गुन्हा करण्याचा हेतू व उद्देश दिसून येतो आणि त्यावरून त्याचेविरूध्द सदरचे गुन्हे सिध्द होतात. करीता त्यांनी आरोपीला दोषी ठरवून जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

१८. त्याउलट आरोपीचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रकरणात फिर्यादीचे पत्नी व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. तसेच सदर साक्षीदाराचे कथनामध्ये महत्वाच्या विसंगती व सुधारणा असल्याचे दिसून येते. त्यामुळे ती विश्वासार्ह नाही. तसेच पंच साक्षीदार फितूर झाला असून केवळ तपासी अधिका—यांच्या कथनावरून आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे त्यांनी आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

१९. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला व उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले. वर नमुद केल्याप्रमाणे, अभियोगपक्ष अभिलेखावर प्रकरणातील मुळ फिर्यादी व जखमीची साक्ष उपलब्ध करण्यास अपयशी ठरला. तसेच घटनेतील जखमी व प्रत्य क्षदर्शी सा.क्र. ३ सुषमा हिने तिचे साक्षीमध्ये आरोपीने तिला व तिचे पतीला मारहाण केल्याचे कथन केलेले आहे, परंतू तिने तिचे साक्षीमध्ये कथन केलेल्या सदर सर्व बाबी तिचे पोलिस बयाणामध्ये नमुद नाहीत. त्यामुळे त्या तिच्या कथनातील महत्वाच्या उणीवा ठरतात आणि दुजोरा देणा—या पुराव्या अभावी तिची साक्ष विश्वासार्ह नाही. प्रकरणात इतर कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. अश्या परिस्थितीत घटनेबाबत संशय निर्माण होतो आणि आरोपी सदर संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहे.

२०. अभियोगपक्षाचा पंच सा.क्र. १ विजय फितुर झाल्याने तपासी अधिकारी सा.क्र. २ श्री. पाउलझाडे यांच्या कथनावरून नि.क्र. २१ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द झाल्याचे ग्राहय धरले तरी त्यावरून आरोपीने सदरचे कृत्य केल्याची बाब निष्पन्न होत नाही. अभिलेखावर फिर्यादीला दुखापत झाल्याबाबत कोणताही वैद्य कीय पुरावा सिध्द करण्यात आलेला नाही. तसेच सदर जप्त काठी आरोपीकडुन जप्त करण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपीनेच जप्त काठीने फिर्यादीला मारहाण करून दुखापत केल्याची बाब सुध्दा संशयास्पद ठरते.

२१. अश्या परिस्थितीत आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला शस्त्राने मारहाण करून दुखापत पोहचविल्याची अथवा शिवीगाळ केल्याची बाब निष्पन्न होत नसल्याने आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम ३२४ व ५०४ अन्वयेचे गुन्हे आकर्षित होत नाहीत.

२२. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा त्रोटक स्वरुपाचा असुन अभियोगपक्ष आरोपीविरूध्द सबळ व विश्वासार्ह पुरावा सादर करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे आरोपीविरूध्द कोणतेही गुन्हे सिध्द होत नाहीत. करीता मी मुद्दे क्रमांक १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात</u> :**

२३. वर नमूद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द न झाल्याने तो निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे प्रकरणात जप्त मुद्देमाल एक वेळवाची काठी जमा असल्यास मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करणे योग्य व उचित होईल. करिता मी मुद्दा क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी वामन बालाजी जगताप यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ अन्वयेच्या आरोपांतून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जुना जामीनकदबा रदद करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७—अ च्या अनुपालनाकरीता प्रत्येकी रुपये १०,०००/— चे वैयक्तीक बंधपत्र व जमानत सादर करावी. सदर जामिन पुढील ६ महिन्यांकरीता अस्तित्वात राहिल व त्यानंतर तो रद्द समजण्यात यावा.

४. प्रकरणात जप्त मुद्देमाल एक वेळवाची काठी जमा असल्यास मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला. )

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.18 15:57:08 +0530

दिनांक : १८/०७/२०२६
ठिकाण : वर्धा

( विक्रांत प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**प्रमाणपत्र**

या पी. डी. एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जितेंद्र हि. जावळे, |
| कोर्टाचे नाव | : | श्री. वि. प्र. खंदारे,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.<br>(फौजदारी न्यायालय क्र. १) |
| पीठासीन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | : | १८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख | : | १८/०७/२०२६ |

स्वा/—

दिनांक : १८/०७/२०२६
ठिकाण : वर्धा

(जि. हि. जावळे)
लघुलेखक ग्रेड ३
प्रथमवर्ग न्यायालय क्र. १, वर्धा